
# माझिया माहेरा जा!



राजा बढे

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
REFBK-0007267
REFBK-0007267





# माझिया माहेरा जा!

व

## इतर वीणागीतें

९०५५१

स्थळ प्रत

REFBK-0007267

REFBK-0007267

मूल्य आठ आणे

सरिता प्रकाशन

मुद्रक
**ज. दि. देसाई**
राष्ट्र वैभव
छापखाना
गिरगांव : मुंबई

प्रकाशक
**ग. का. रायकर**
झावबाची वाडी
ठाकुरद्वार
मुंबई नं. २

सर्वाधिकार
**सरिता
प्रकाशन**
किशोरी विहार
मुंबई नं. २८

प्रथमावृत्ति
दीपावलि
१९४९

विक्रेते
**जय हिन्द
प्रकाशन**
झावबाची वाडी
मुंबई २

## सरितृगान !

कवि **राजा बढे** यांच्या ध्वनिमुद्रित झालेल्या वीणागीतांचा हा संग्रह वाचकांना सादर करतांना मला फार फार आनंद होत आहे. बोलपटांतील गाणीं, नाटकांतील गाणीं व ध्वनिमुद्रितासाठीं रचलेल्या गाण्यांत फारसें **काव्य** नसतें असें टीकाकार म्हणतात ! त्यांनीं हा संग्रह अवश्य वाचून पहावा. " खरें खरें काव्य म्हणतात तें हेंच " असेंच त्यांना या संग्रहाबद्दल लिहावें लागेल याबद्दल मला यत्किंचितही शंका नाहीं.

हीं गाणीं ध्वनिमुद्रित करण्यासाठीं म्हणून मुद्दाम लिहिलेलीं नसून कवींनीं आपल्या समाधानासाठीं लिहिलेलीं होतीं. रसिकांना तीं फार आवडलीं म्हणूनच ध्वनिमुद्रित झालीं. हा फरक लक्षांत घेतला म्हणजे या संग्रहाचें रसग्रहण चांगलें होईल.

सुप्रसिद्ध कवि कै. **जयकृष्ण केशव उपाध्ये**, यांचें 'हा नाद ओळखीचा' हें ध्वनिमुद्रित वीणागीत श्री. बढे यांच्या अनुमतीनें यांत संग्रहित केलेलें आहे.

कवींनीं हा **बहुमोल** ठेवा माझ्या स्वाधीन केला तो मी रसिकांना **अल्प मोलानें** वाटीत आहे.

—**प्रकाशक**

★

# टोचणी

रसिका ! नको धरूं संकोच !
दीडवितीच्या सरकमुइवॅर,
सुया सारख्या टोच
नको असूया टीकाकारा !
नको तुझी ती चोंच
चिवचिवतें, ही वीणागीतें
टोचीमधुनी खोंच
पत्रपंडिता ! निदान द्यावी
टोचागितांची पोंच
तुझ्याच खातर गाइन रसिका
मला जिव्हाळा तोच

—राजा बढे

दीपावलि
१९४९

३०५६१
स्थळ प्रत

# गीत संगती


१ शबरी ५
२ सोडी माझा पदर हरी ६
३ माझिया माहेरा जा ७
४ हा नाद ओळखीचा ८
५ नका मारूं खडा ९
६ घाव घातला उरीं १०
७ हांसे चंद्रिका ११
८ आला ग बाळराजा १२
९ गोजिरा ग भाऊ माझा १३
१० तुज काय सांगु सावळ्या १४
११ वाट पाही गोकुळीं १५
१२ तुजवरी कशी फिर्याद करूं १६
१३ हासताच नार ती १७
१४ हंसतेस अशी कां मनीं १८
१५ मृगाचा हा पहिला शिरवा १९
१६ शाळूवरती आलं पांखरूं २०
१७ लाख बोल साहिले २१
१८ झाली पहाट २२
१९ तुला लागलेला छंद २३
२० उजळूं दीपमाला २४
२१ आज भाऊबीज आली २५
२२ सखये प्रेमपत्र पहिलें २६
२३ नदी किनारीं माझा गांव २७
२४ झोपल्या राघू मैना २८
२५ उगवूं मोतीचुरा २९
२६ वयाचा वसंत फुलला ग ३०
२७ मी तर चापेकळी ३०
२८ आला गडे तुझा व्रिजलाल ३१
२९ कां दयाळा अंत माझा ३१
३० सखि वसंत ये ३२
३१ प्रेम केलें काय हा झाला ३३
३२ फुलला ग बाई फुलोर ३३
३३ साहुं कशी विरहा ३४
३४ तूं कुठें अन् मी कुठें ३५
३५ राउळीं झाली चोरी ३६
३६ रे विसरलास ३७
३७ करवंदीमागें ३८
३८ हसलें मनिं चांदणें ३९
३९ पारवा पिकावरी झुकला ४०
४० नयन खेळले जुगार ४१
४१ मी तुझी शकुंतला ४२
४२ रुतला गुलाब कांटा ४३
४३ लाजरा बहाणा ४४
४४ सोड मिठी जादुगारा ४५
४५ कधीतरी कुठेतरी ४६
४६ सखि जपून जा ४७
४७ वीणे ४८



# शबरी

विनवित शबरी रघुराया रे !
तुजसाठीं वेचिलीं बोरें
भागला, भुकेला असशिल देवा !
जमविला रानचा मेवा
दीनेची दुबळी सेवा
ही गोड मानुनी घे रे
नच उष्टावलि कुणी, मीच स्वयें तोडिली
चिमणीचे लाउनि दांत, चवी घेतली
शिवली न दुजी पांखरें
मनिं शंका धरिसी कां रे ?
तुज मधुर लागतिल ही शबरीची बोरें

: गायिका :

सौ. हिराबाई बडोदेकर

# सोडी माझा पदर हरी

सोडी माझा पदर हरी, हा
घागर भरलीं, शिरी जाउं दे
बांधिला हिंदोल दोन्ही भुजांचा
आंदोल विंदोल करिशी साचा
झोका थांबिव रे, मोहना- जाउंदे
अंग अंग बघ भिजले सारे
ओठीं विरले बोल
कुंतल काळे, नागिण लोळे,
पायीं घालीत घोळ
व्रिजलाला रे विकल राधिका
फसली तुझिया नादें-
पुरे पुरे ही कंदुकलीला
आतां बाल मुकुंदा
हृदयीं वससी, अधरी हससी
मुकुलित नयनानंदा
वृंदवासिनी राधा रमली
मंजुळ मुरली नादें
सोडी माझा पदर हरी, जाउंदे.

: गायिका :
हिरा बखले

# माझिया माहेरा जा!

माझिया माहेरा जा ! रे पाखरा,
माझिया माहेरा जा
देते तुझ्या सोबतीला, आतुरलें माझें मन
वाट दाखवाया नीट, माझी वेडी आठवण
मायेची माउली, सांजची साउली
माझा ग भाईराजा
माझिया माहेरा जा
माझ्या रे भावाची उंच हवेली
वहिनी माझी नवीनवेली
भोळ्या रे सांबाची भोळी गिरिजा
माझिया माहेरा जा
अंगणांत पारिजात, तिथं घ्या हो घ्या विसांवा
दरवळे बाई गंध, चोहिंकडे गांवोगांवा
हळूंच उतरा खालीं, फुलं नाजूक मोलाची
माझ्या माय माऊलीच्या, काळजाच्या कीं तोलाची
तुझी ग साळुंकी, आहे बाई सुखी
सांगा पाखरांनो, तिचीये कानीं
एवढा निरोप माझा
माझिया माहेरा जा

: गायिका :
सौ. जोत्स्ना भोळे

★

# हा नाद ओळखीचा !

त्याच्याच पावलांचा । हा नाद ओळखिचा ग


कमलें सरांत फुललीं
कुसुमें वनांत खुललीं
करण्यास मान त्याचा । हा नाद ओळखीचा ग
येतां सखा हसूं का !
क्षण कांहिं वा रुसूं का !
रुसवा हसावयाचा । हा नाद ओळखिचा ग

लटके रुसून कांहीं
क्षण बोलणार नाहीं
हा मान मानिनीचा-हा नाद ओळखिचा ग

कवटाळिता तनूला
कुरवाळिता हनूला
रुसवा टिके कशाचा । हा नाद ओळखिचा ग

विसरून जीव भावा
देईन आत्मदेवां
तांबूल चुंबनाचा-हा नाद ओळखिचा ग

गायक : वाटवे ⊡ कवि : कै. जयकृष्ण केशव उपाध्ये




नका मारू खडा, शिरीं भरला घडा
सख्या जाईल तडा
हे भिजेल गोरे अंग !
( ऐके न बाइ तरी हसे खदखदा
असा कसा श्रीरंग ? )
नको धरूं हात रे, पिचेल माझा चुडा
सुटेल बाई जुडा, अवखळा
भिजतिल काजळफळा
( ऐके न बाई तरि, घालि हात उरि
करि डोळा वाकडा )
थंडीत भरे हुडहुडी
थरकांपे माझी कुडी
ती खरी सुखाची घडी
घे बळेच ओढुनि कवळि रेशमी शेला
जवळी न कुणी मग कोण येइ हाकेला
अधरिचा मधुर मधु मेवा
मुरलीस वाटला हेवा
हें असें काय हो देवा ?
( फुटुं द्या आता घडा, खुशाल मारा खडा
यापुढें कधि न मी करीन हो आरडा )

: गायक :
वाटवे

## घाव घातला उरीं

घाव घातला उरीं साजणी
पाहिलेस रोखुनी
कळलें साऱ्या जगास बाई कोण असे तो खुनी

भरलें कां अंगांत कांपरे, गाल ओठ रंगले
चढली कमान भाली तुझिया इंद्रधनू भंगलें

दिसे उमटुनि लखलख अंगीं रम्य विजेचा बांध ?
कसा लपावा अंधारीं या नवपुनवेचा चांद

शोधायातें तुला चहुकडे सुटले बाई हेर
खुणा लाजऱ्या लेउनि कैसी पडशिल बाहेर

जाउं नको रे दूर पळोनी माझ्या हसऱ्या फुला
चल ये माझ्या मनीं लपाया
कुणी न हुस्किल् तुला

: गायक :
भाटकर

★



# हांसे चंद्रिका

हांसे चंद्रिका,

नीलजलीं डोले नौका

जलवंतीची तरंगलीला
प्रतिबिंबाचा खेळ रंगला
प्रेमी युगुलांचा हिंदोला
झुलविति या झुळुका

ओठांतुनि निखळलें चांदणें उलतां अधरदलें
प्रीती मानससरांत फुललीं दोन निळी कमळें
भुलवी नाविका

: गायिका :
सुमन माटे

★

# आला ग बाळराजा

आला ग बाळराजा
माझा ब्रिजलाल

सुचे न कांहीं मला !
कुठे ग ठेऊं याला !

हृदय हिंदोल्यांत
हिंदवूं नंदलाल

माझीच मेली धीट
लागेल बाई दीठ

लाविता गालीं तीट–
फुगवितो गाल

माझा ग राजबिंडा
धांवता दुडदुडा

जरीचा हाले गोंडा
घुंगुर धरी ताल

लबाड हसतो ग
सारखा छळतो ग

म्हणे ग ' आई आई
मला जेऊं घाल '

: गायिका :
सरस्वती माने

★

# गोजिरा ग भाऊ माझा

गोजिरा ग भाऊ माझा
किति दिसानं भेटला
कळि कळि उमलली मनीं
आनंद दाटला

खुदुंखुदुं आलं हासू, दारिच्या ग चमेलीला
हसायाला काळवेळ, कांहीं नाहींच मेलीला

कुजबुजती कानांत, अंगणीं या जाइजुई
जिव्हाळ्याचा बाळझरा नाचे बाइ थुइथुई

कुरवाळतो ग मोगरा, नाहीं मुळीं त्याला भान
मिटली ग संकोचानं लाजाळूची पानं पानं

डिवचते सदाफुली, लपलेल्या बकुळीला
डोलतो ग सोनचाफा फुटे बोल अबोलीला

फुलामुलांच्या मेळांत, नाहीं कुठं भेदभाव
हसवावे डुलवावे सकळिका एकठाव

: गायिका :
सरस्वती माने

★

# तुज काय सांगुं सावळ्या

तुज काय सांगुं सावळ्या कहाणी जुनी
कशि गड्या कळेना दासीची विनवणी

अशि पाडुं नको रे जीवकुडीची तुटी
तें रूप मनोहर कधिं या पाहिन दिठीं
ही युगायुगांची अशीच राहो मिठी
तूं मला साजणा तुलाच मी साजणी

मज वेडी म्हणतिल जनीं
मी हसेन मनिंच्या मनीं
साठवितां तुज लोचनीं
ओळखिलें सखया, पाहिलें न लाजुनी
उठले तरि देवा मी संसारांतुनी

: गायिका :
प्रमिला जाधव

★

# वाट पाही गोकुळीं

वाट पाही गोकुळीं मोहना, तुझी रे चंद्रावळी
फिरे पांखरापरी माधवा, राधागौळण खुळी

हंबरती गोपाला धेनू तुझ्या कदंबातळीं
बिंब तरंगे शामसुंदरा, अजुनी यमुनाजळीं

विसरलास का गोकुळा ?
तो वेणूरव मंजुळा
जीवास लागला लळा

लीला तव पाहता वाहिल्या आनंदाच्या सरी
सुनी तुझ्याविण बालमुकुंदा, नन्दाची ओसरी

किती काढूं रे आठवणी
गेले दिन हरिणावाणी

शामा ही तव मेघश्यामा आळविते वावळी
भेटल का कधिं कृष्ण सांवळा गोकुळिचा गवळी

: गायिका :
सरस्वती माने

★

# तुजवरी कशी फिर्याद करूं

तुजवरी कशी फिर्याद करूं
हा कशास भलता वाद धरूं ?

वसेल साधीभोळी लतिका
कुणाभोवतीं घालुनि विळखा
उन्मळता माझा कल्पतरू

भोगायातें क्षणिक सुखाला
भाळुन खोट्या अभिमानाला
मीपणांत का सर्वस्व हरूं !

अढळ प्रीतिच्या मंगल धामीं
अनंतांतल्या त्या आरामीं
ये मिळुन कोवळे रंग भरूं

दूर दूर राहिलों जीवनीं
जातांना परतून ठिकाणीं
भेटतील शेवट वाटसरूं

: गायिका :

★ सौ. कांचनमाला बढे

# हासताच नार ती

हासताच नार ती अनार मस्कती उले
पारिजात लाजती मनांत जाइचीं फुलें

ऐकुं येइ गीतिका सुरासुरांत ओविली
तार कंपिता हृदीं नि झार पैंजणांतली

कोवळ्या फुलांवरून टाकि मंद पाउलें
नाचती उरावरी तरी चकोरमंडळें

सोडिलेस भोंवताल धीट नैनपारवे
तुझ्या अजाण प्रीतिचे कुरंग खेळती सवें

रान मोकळें तुला दबा धरून घ्या उडी
वेढण्यास सावजास कोवळे सवंगडी

येत कोण ते पहा, हळूंच चोरपावलीं
जपून हालचाल ही हले तशीच सावली

तीर हातुनी सुटे, अधीर झेप टाकली
कळे न सावजासही कुणी शिकार साधली

: गायक :
वाटवे

## हंसतेस अशी कां मनीं

हंसतेस अशि कां मनीं,
कोण ग उभे तुझ्या अंगणीं ?
कितिकदां वळुन् पाहशी
अन् पुन्हा नजर वळविसी
हा लपंडाव खेळसी
कोण ग उभे तुझ्या अंगणीं ?

अडविसी मुखावर हसे
थरकांप हृदयिं होतसे
लागलें कुणाचें पिसें
कोण ग उभे तुझ्या अंगणीं ?

वळते न जीभ, कां मुकी ?
रक्तिमा पसरते मुखीं
रेखिलें चित्र हें कुणी
कोण ग, उभे तुझ्या अंगणीं

कोण ग ! तेच का गडे ?
पण कशास हो एवढें !
अगबाई मुळिं न आवडे
नव्हे का नांवहि तें भाषणीं !

: गायिका :
लता मंगेशकर

## मृगाचा हा पहिला शिरवा

मृगाचा हा पहिला शिरवा
घालील तुला ग शालू हिरवा हिरवा

ते इंद्रगोप इवले
पदराला मोतीं खुले
दवबिंदूंची नाजुक जाळी लेउनिया मिरवा

जलभुईवरी जलधारा
वसुमती तुझ्या अभिसारा
ओठावरती मृदुहास्याच्या जाइजुई फुलवा

हें पिकेल सोनें जईं
नटशील कशी ग सई
कणसावर येतिल तुरे लवथवे बाग तुझा हिरवा

: गायिका :
वासंती

★

# शाळूवरती आलं पाखरूं

शाळूवरती आलं पांखरूं
नका हाणु गोफणी,
घरधनी !

होइल ना घायाळ मंजुळा
मुसमुसली ज्वानी !

अजून हिरवाकंच हरबरा ऊस लागला लवूं
कणसावरती तुरा डोलतो भरास आला गहूं
मिश्रूड गव्हाला फुटे,
कोवळें काटे
या उरीं सुयांची गोड गोड बोचणी घरधनी
होइल ना घायाळ मंजुळा मुसमुसली ज्वानी !

चला उसाच्या मळयांत राया
गळयांत घालू गळे
डोळे भरुनी ऊस पाहतो
इतर न कोणा कळे
ओठांतच जिरवूं रंगदार लावणी
घरधनी, होइल ना घायाळ मंजुळा...
मुसमुसली ज्वानी !

: गायिका :
ललिता परुळेकर

## लाख बोल साहिले

तुजसाठीं राया रे लाख बोल साहिले
मोहुनिया पाहिलेस
पाहुनिया मोहिलेस
पाहिले नि लाजले नि लाजुनीहि पाहिले
फिरुनि फिरुनि पाहण्यास नयन पिसे जाहले

चैत्रि कोवळया उन्हांत
शरदाच्या चांदण्यांत
तुजसंगें अंग अंग प्रीतरंगिं नाहले
अंग अंग नाहले
घेतलेस जीवदान मूक आसवांतले

सुटले माहेर मला
तुटले रे उभयकुला
मोजतां न येति उरीं जहरि बाण लागले
फुटले रे हे जिव्हार तरिहि प्रेम लाभले

चहुकडुनी तुटति विजा
विरह मेघदूत तुझा
लागलि बरसात त्यांत नांव गांव वाहिले
माझें मजजवळि सख्या कांहिही न राहिले
लाख बोल साहिले

:गायिका:
सौ. कांचनमाला बढे



५२८८

# झाली पहांट

झाली पहांट
विरे काळोखाचा वेढा
चांद वळला वाकडा
पहा उजळल्या कडा, डुले दारिचा केवडा
भंवती जंगल दाट
साद घालितो कोंबडा, उठा नयन उघडा
वाजे राउळीं चौघडा, पडे प्राजक्ताचा सडा
खचली पाऊलवाट
घरघर घरोघरीं, सूरमंजुळ लहरी
तरंगत वाऱ्यावरी जाती पहिल्या प्रहरी
गाती सृष्टीचे भाट
जाता गुंजती गौळणी, मंद पैंजण पावली
कटिकुंभ आंदोलती गानीं गुंग भृंगावली
बोले पाणियाचा घाट
झोपडींत मायलेकी, दळताती सासूसूना
तुझें पाऊल पडूंदे अंगणांत नारायणा
उजळित पुढली वाट

: गायिका :

जोत्स्ना भोळे

# तुला लागलेला छंद

कळला रे राया मला, तुला लागलेला छंद
कुणालागी आठवीता सैल झाले बाजू बंद ?
सैल झाले बाजूबंद,
तुला लागलेला छंद

कुणाच्या रे यौवनाचा गालिचा हा मखमाली
मळविती सराईत नजरेच्या चोरचाली
नाहीं उतरली धुंद ?

कुणाच्या रे कुंकवाची लांब पुसटली चिरी
उमटलें मीलन राया तुझिया खांद्यावरी
चोरभेटीचा आनंद ?

नयनांच्या लालीतून दिसे छबी रंगलेली
कां रे उचकी लागली कुणी आठवण केली ?
कुणा डोळयाचा हा फंद ?
कळला रे राया मला तुला लागलेला छंद

: गायिका :
ललिता परुळेकर

★




उजळूं दीपमाला,
सखे ग घालूं प्रीतमाला

उजळित हा अवनी पहा
दिवाळीचा सण आला

एक एक चांदणी
येत ही नभांगणीं
गगनिं दिवे, भुवनिं दिवे
नटलि चंद्रशाला

उधळित मधुसुमगंधा
येइ सख्या आनंदा
भेटवी रे भेटवी त्या
नंदनंदनाला

: गायिका :
मोहनतारा तळपदे



# आज भाऊबीज आली!

आज भाऊबीज आली
पहा सांजेची नव्हाळी
उभी तारका आभाळी
भाऊरायाला ओवाळी

घ्या हो करीं नीरांजनें
प्रीती भरली लोचनें
दूर गुंतलेलीं मनें
माहेराच्या मोहजाळी

दिपवीत तिन्ही लोका
आला ऐकुनिया हाका
भाऊ माझा पाठीराखा
करूं साजरी दिवाळी

: गायिका :

मोहनतारा तळपदे




सखये, प्रेमपत्र पहिलें
मखमाली गालावरि लाजत
अधरांनीं लिहिलें

अंगांगावरि रंग पसरला
मणिबंधीं फिरफिरुनी पुसला
उपाय माझा पुरता फसला
यौवन रसरसलें

वाचायातें नयनें मिटलीं
तरिहि लाजरी हौस न फिटली
जाति न लिखितें पुसता पुसली
अंतरंग कळलें

सखये-प्रेमपत्र पहिलें

: गायिका :
कु. सुमन माटे





नदीकिनारीं माझा गांव

ऊन पाऊस शिवेना मोहाची छाया दाट
आंब्याच्या राईतून गेली माझ्या
माहेराची वाट
तिथल्या प्रेमळ आठवणींचा
उरीं कोवळा घाव

किती काढसी श्रावण मेघा
विरतिल पाण्यावरती रेघा
झरझर सरत्या वाळूवरती
अजुनि उमटलें नांव

नकळे बाई कुणी वसविला
चराचरांच्या मनीं ठसविला
पैलतिरीं न्यायास एकली
प्रभुनांवाची नाव

: गायिका :
भानुमती कंस



# झोपल्या राघूमैना

झोपल्या राघूमैना,
गळयांत घालूनि मिठी
झांकुनी लाज लाजऱ्या नैना

दो दिवसांचे गोड चांदणें
जाइल जळुनी अभिमानें
उरतिल अपणा, छळावयाला
लांब काजळी रैना

नकळत झुलता प्रीततरंगें
मनीं रेखिली मधु प्रतिबिंबें
नजरेतुनि निखळता, साजणी
जाइल फुटुनी ऐना

ः गायिका ः
मीनाक्षी

# उगवूं मोतीचुरा



ये पिकवूं अपुलं शेत मंजुळे, उगवूं मोतीचुरा
तुझ्या नि माझ्या रान-प्रीतिचा झुळझुळ वाहे झरा
गुणगुणत करूं लावणी
घरधनीण अन् घरधनी
हळदीचे फिरती हात, नांदती लक्ष्मि माझे घरा
हें ओलवतीचं पाणी
करि बोलवती ही राणी
वर अंबर भरलं, सरसर झरलं, भिजली सारी धरा
मंजुळे उगवूं मोतीचुरा
बघ भरारला जोंधळा
हालते पात सळसळा
ते हिरवे लोलक डुलति मजेनं, भरला ग हरबरा
मंजुळे उगवूं मोतीचुरा
मोत्यांची आंतरमाया
संभाळ कोवळी काया
येईल कळप राघुचा मारिते साळुंकी लहरा
: गायिका : आली ग ज्वानी तुझी बहरा
मालती पांडे मंजुळे उगवूं मोतीचुरा

## वयाचा वसंत फुलला ग

वयाचा वसंत फुलला ग
तुला हा मन्मथ भुलला ग
मोहरली तनु थरथरे
फडफडति नयन पांखरे
ती किणति कंकणें करीं
बघाया चंद्रहि कलला ग
तूं निघालीस एकटी
शोधाया यमुनातटीं
तो वाळवंटिं राधिके एकला
मनांत हंसला ग

: गायिका :
वासंती

★

## मी तर चापेकळी

करिसी गुंजारव कां भ्रमरा
मी तर चांपेकळी
ही कमळण नोहे रे खुळी
कळली रे रसिका प्रीत तुझी चंचल
भलताच खेळ हा नको, सोडि अंचल
सौभाग्य दान दे करुनी शुभमंगल
ही प्रीतनिर्मला, जरी जन्मलें
कलंकितेच्या कुळीं
भ्रमरा मी तर चापेकळी

: गायिका :
सुमन माटे

## आला गडे तुझा ब्रिजलाल !

आला गडे तुझा ब्रिजलाल !
शोधुनि शिणली, नजर लाजरी
सुनाच रंगमहाल
काळवेळची शकुनवंति ही
चुकचुकली ग पाल
लबाड मधुपा कलिकेचे या
कुस्करिसी कां गाल
कसे बाइ ग, जुळता नजरा
हासत विणलें जाल

: गायिका :
वासंती

★

## कां दयाळा अंत माझा पाहसी ?

कां दयाळा अंत माझा पाहसी
ये उडोनी राजहंसा मानसीं
दूर देशीं गुंतला माझा धनी
शोधिते ग त्या विहंगाला वनीं
आडवे हे हात सारोनी दुरी
मेघमाले, येऊं दे त्याला घरीं
या वियोगें ही झुरे संयोगिता
कैंवि यावा योग, राया भेटसी
घे मला पंखांत, माझ्या पांखरा
प्रीतिची ती ऊब सेवूं दे कुशीं

: गायिका :
सौ. कांचनमाळा बढे

# सखि वसंत ये

सखि वसंत ये, वसंत ये, वसंत ये
शर सावर हा मदना रे
फुलवाया, ललितलता या सुखशीतल वाहत वारे
यमुनापुलिनी प्रतिबिंबाची कालिंदी करि चोरी
डोलविती हा जलहिंदोला हांसे चंद्रचकोरी
गोरी राधागौळण आली भेटायास मुरारे !

कळली रे गुपितें लालस लोचन नटले
हसशी कलहंसा पंख जरी ते मिटले
मधुयौवनरंग खुलवि अंग अंग अंग सखी
झुलत प्रणयभारे

रास खेळतो गोपखिलारी घेऊनि अधरी मुरलीला
नयनांच्या मृदुशयनावरती नीज राजसा घननीळा
राधामाधव वसंतरंगीं रमले गोकुळ सारे

: गायिका :
सुमन माटे

# प्रेम केलें काय हा झाला गुन्हा

प्रेम केलं काय हा झाला गुन्हा ?
अंतरीची भावना सांगूं कुणा ?
भोगिली शिक्षा पुरी मी प्रीतिची
साहवेना ती सुखाची वेदना
बोलुनी केलीस ही जाहीर चोरी
हांसशी कां रे गुन्हेगारा पुन्हां ?

: गायक :
हळदणकर

★

# फुलला ग बाई फुलोर

फुलला ग बाई फुलोर
वरि चंद्राची हसरी कोर
तुझ्या नोकेंत लहरी पोर
पापणिचा थरकांप सारखा
हृदयीं प्रणय हिलोर
चंद्रमुखीची नवीनव्हाळी
केळपान कीं पाठ कोवळी
पिउन चांदणं लोळत पडली
नागिण काळीभोर.
आली धांवत भरतीची लाट
खुल्या पदराचा भिजला कांठ
परस्परांच्या मनांत लपती चांदण्यांतले चोर

: गायिका :
प्रमिला जाधव

★

## साहुं कशी विरहा

सखि आतां या साहुं कशी विरहा
वाट बघत मी सांजसकाळीं
आळवींत प्रणया

धरुनि अबोला तुजवरि रुसलें
भुजकुंजवनीं लाजत फसलें
हांसवि नाचवि हृदया

वाळवंटि ही प्रीत जोडिली कंठी घालुनि मिठी
पळांत जुळली हाय जाहल्या पळांत ताटातुटी
मोहवि मोहमयी दुनिया

: गायिका :

★ सौ. कांचनमाला बढे

## तूं कुठें अन् मी कुठें

हासल्या ओठावरी त्या लाजऱ्या जाईजुई
तें हंसे दूरावले ग
तूं कुठें अन् मी कुठें
नांदतो मी भूतलीं तूं देवता स्वर्गांतली
अंतरानें बांधलो गे
तूं कुठें अन् मी कुठें
लोक दृष्टीला दिसेना प्रीतिचा आलोक तो
हांसती या वेडप्याला
तूं कुठें अन् मी कुठें
घातल्या आणा गळ्याच्या घालतांना ती मिठी
कीं कधीं सोडूं न कोणा
तूं कुठें अन् मी कुठें
जागवील्या रम्य रात्रीं पारिजाताच्या तळीं
सांगता गोष्टी मजेच्या
तूं कुठें अन् मी कुठें

: गायक :
भाटकर

★

## राउळीं झाली चोरी

राउळीं झाली चोरी  चोरोनी कुणी नेला
कुठें रे भुललासी  रेशमी तुझा शेला ?

नोहे रे कृष्णामाई  नोहे रे भीमगंगा ?
धांवण्या धावलासी  कुणाच्या पांडुरंगा

भाळून भक्तालागी  गेलासी लगबगा
झांकाया हालचाल  अंधार मनाजोगा

लोळण घेई पायीं  आतुर चंद्रभागा
भिजला पितांबर  भिजला तुझा सोगा

उराशीं कवळून  हृदयीं लपविला
चोरोनी कुणी नेला  रेशमी तुझा शेला
तुझिया संगतीनं
देवा रे आळ आला
मायेनें कुणावरी  तुवांच पांघरीला
कोण ती अशी चोर  कळलें विठ्ठू मला
जनीच्या उशीखालीं सांपडे तुझा शेला

: गायिका :
विजया देसाई
( गळ्याची शपथ )

★

# रे विसरलास

रे विसरलास, काय आज प्राणजीवना
नच पुसल्या अजुन भावप्रीतिच्या खुणा

कधिं येशि राजसा
जीव हा पिसा
बघ अश्रुमणी ओघळून जळत भावना

तुजसाठीं झुरते रे !
मी मरणीं मरते रे !
तळमळते ही मीना जीवनाविणा

येइ रे विहंगमा
प्रीतपांखरा
काशि धीर धरूं आठवांत आवरूं मना

: गायिका :
विनता अमलाडी

★

# करवंदीमागें

करवंदीमागें उभी लाजरी पोर
कीं ढगाआड ती लपे विजेची कोर
चालली करुनि अभिसार कुणा भेटाया
डोकाउनि बघती तुला तरूंच्या छाया
हुडकशी रातदिन अशी प्रीत आनंद
कुंजांत कोठल्या लपला गे गोविंद
–जिवाचा चोर

हा अवखळ वारा जन्माचा छळवादी
प्रणयाचे भरतो सूर भावसंवादी
चाहूल तुझी ऐकिली लतावेलींनी
कुजबुजती कलिका परस्परांच्या कानीं
लाजरी पोर

थरकांप जिवाचा असा नाच नयनांचा
पावलोपावलीं गडे फुलांच्या ढेंचा
बसवेल कुठवरी उगे पायिं नुपुरांना
हळुहळु गुंजलि मधुबोलांची वीणा
लाजरी पोर

कां उगाच चाळा गडे असा पदराशीं
लाजेचा चाले विलास मृदु गालांशी
कुरवाळुनि तुजला देत धीर जलवंती
शिकविते बोल प्रीतिचे रंगरसवंती
लाजरी पोर

★

: गायिका :
ज्योत्स्ना भोळे

# हसलें मनिं चांदणें

हसलें मनिं चांदणें
जपुनि टाक पाउलं साजणी नादतील पैंजणें

बोचतील ग फुलं जाइची तुझी कोमला काय
चांदण्यांतही सौंदर्या रे पोळतील ना पाय

पानांच्या जाळींत लपोनी चंद्र पाहतो गडे
सांग कुणाच्या भेटीसाठीं जीव सारखा उडे

कुजबुजुनी कानांत सांगतो मधुप, नको ग रुसूं
लाजलाजऱ्या कळया फुलांना खुद्कन् आलं हसूं

भिरभिरतांना नयनपांखरे ये पंखाचा वारा
मृदु आघातें पहा छेडिल्या हृद्‌विणेच्या तारा

हो जरा, वघा कीं वरी, कळूं द्या तरी
उमटुं द्या वाणी
कां आढेवेढे उगाच सांगा काय लाभलें राणी ?

कां ग अशा पाठीस लागता मिळुनी साऱ्या जणीं ?
आज लाभला मला माझिया सर्वस्वाचा धनी
किति, किती ग भाग्याची
भलतीच ओढ ही कामसुंदराची
नव्हे ग शामसुंदराची

: गायिका :
जोत्स्ना भोळे

★

# पारवा पिकावरी झुकला

चुकली ग गोफणफेक
लाजरा नेम आज झुकला
रानराघुचा कळप बाइ ग पिकावरी झुकला

ही लवली काया घेतां गोफणगिरकी
मिसळली तयांतच उरांतली थरथर कीं
अन् नेम लागला तेढा
आला गळ्यांत गोफण वेढा
हासला पाहुनी गहूं हरबरा पिकला
पारवा पिकावरी झुकला

नवतिचा पाहुनी मळा
काळिची कोवळी कळा
ये राजरोस वावरीं, पाहुणा पायवाट चुकला
पारवा पिकावरी झुकला

: गायिका :
लता मंगेशकर
( गळ्याची शपथ )

★

## नयन खेळले जुगार

मोहुनिया तुजसंगें नयन खेळले जुगार
ओठावरलें हासें
फेकियले रे फासे
खेळाचा होय निकुर, हो जिवलग जादुगार

सहज पडे तुजसि दान
लागले पणास प्राण
मीपणांत मन हरलें—येइ रे गळ्यांत हार

सारिलेस मोहरें
सहज अडविलेस चिरे
बंद जाहली घरें—खेळ संपणार पार

पळभर जरि जुग जुळलें
कटिवरुनी वरि सरले
एकुलती एक नरद पोटघरीं होय ठार

पटावरून लाजरे
पळे घरांत मोहरें
बाजू बिनतोड मला देइ चतुर हा खिलार

: गायक :
वाटवे

★



# मी तुझी शकुंतला

आलें नगरीं तुझ्या नृपाळा
प्रीतफुलांची लेउनि माळा
आलें नगरीं
ओळखिलें काय मला जीव जिथें गुंतला
वनांतली, मनांतली मी तुझी शकुंतला
आठव ती शुभमंगल वेळा
पुसत तुझें नांव, गांव, येत खुळी बालिका,
हरवली सख्या कुठें तूं दिलीस मुद्रिका
घ्या हो पदरीं मला कृपाळा

★

: गायिका :
कु. सुमन माटे



# रुतला गुलाब कांटा

रुतला गुलाब कांटा
नकळे कुठं कधीं हा
अडवीत वाट माझी
हा ताटवा फुलांचा
या पुष्पवाटिकेच्या
माहीत चोरवाटा
ही वेदना सुखाची
दुखऱ्याहि अंतराला
अन् ओठपाकळ्यांचा
होणार काय तोटा ?
ये छेडता मजेनें
मखमालि गालि लाली
रे लाडक्या गुलाबा !
उलटेल डाव खोटा

: गायिका :
सुमन माटे

# लाजरा बहाणा

कुणा कुणा ग कुणा कुणा,
सांगशि हा लाजरा बहाणा ?
भेटायातें अता तुला ग कुठला बाई वेळ
सुरू जाहला संसाराचा पहिला वहिला खेळ
अर्ध्या मिटल्या पापणिच्या या
कळल्या बरं का, खुणा खुणा !
नाहिच का ग बोलायाचें ?
काम दुजेच अतां ओठांचे
नको तरी वाटतें हवेसे
पुन्हा पुन्हा कां पुन्हां पुन्हां
मुल्खाची ही लाज धिटुकली
चहाड मेली, सांगत सुटली
संकोचाला वाचा फुटली
कसा लपावा गुन्हा गुन्हा ?
चांदण्यांत जी फुलुनी हसली
नाजुक नार कशी ग रुसली
चांदण्यांतली वेल करपली
नको छळूं रे उन्हा उन्हा !
किती युगांचा दिन ना जाई
सरत रात ती पळांत बाई
राजाविण वाटतो कसा ग महाल तुजला सुना सुना !

## सोड मिठी जादुगारा

सोड मिठी जादुगारा
मोहमयी रात सरे
जागविता आठव तो
गोड वेदनेंत उरे

कां नीज भरे-कैंवि कुणि नयनिं दिसावा
भुजबंधीं हा मिलिंद घेइ विसावा

लाजुनिया रजनी पळे
लोटुनिया चंद्रकरां
दीपकळी मालविता
हासते वसुंधरा

बघ ओघळलें गालि सख्या काजळ काळें
करकंकण मूक तरी पायल बोले

मधुर स्वप्न हें विरलें
ऊठ ऊठ राजिवा
शकुंत गाति गीत ये, दिवस हा नवा

दंवबिंदुतुनी, इंद्रधनू देइ पहारा
उघडी कलिके दार, रवी येत विहारा

: गायिका :

विनता अमलाडी

# कधींतरी कुठेंतरी

कधींतरी, कुठेंतरी, फिरून भेटशील का ?
अनोळखी मुशाफरा हसून बोलशील का
पाहिलें पुन्हां पुन्हां
झांकला तुझा गुन्हा
लाजेची नजरझुंज लपुन खेळशील का ?
लपून खेळशील का, फिरून भेटशील का
जीभ कां जडावली
जाशि परत पावली
जातांना एकदांऽ वळून पाहशील का ?
वळून पाहशील का, फिरून भेटशील का
या मनांतली छबी
ही इथेंच कीं उभी
ओढ लागली तुझी–कळून हांसशील का ?
कळून हांसशील का-हसून बोलशील का ?
कधींतरी, कुठेंतरी, फिरून भेटशील का ?

: गायिका :
लता मंगेशकर

# सखि, जपून जा

सखि, जपून जा ग,
जपून जा ग, जपून जा
कुणि येइ तुला हुडकाया
जलधारा, अविचल वारा, भिजवाया कोमल काया

भरली यमुना, तीर दिसेना, वाहे पूर तमाचा
भावतरंगें, भिजलीं अंगें, धांवे धीर मनाचा
आली बाला, व्रिजलाला रे ? तुझिया मनीं लपाया

रशनेचे मणि किणती कंप भरे कटिबंधा
करि कंकणरव मधुरा, मंद घात मणिबंधा
सखि सांगति पदनुपुर बोल बोल गुंजुनिया
जाय नटुनि जाया

पीळ उकलले पडता गांठी, भरले भिजल्या पदराचे
एकांतीं आलिंगन भेटी, मीलन मिटल्या अधरांचे
वीज चमकली पहा पहा ती, दिसती हलत्या छाया

: गायिका :

कु. हीरा बखले

## वीणे !!

रजवूं ये चल, मंजुळ वीणे ! व्याकुल आपुली राणी
आळविसी कां कंपितहृदयें निराश रामकहाणी
तुझा नि माझा गडे जिव्हाळा
गाऊं ये, गळयांत घालुनी गळा
साज न बोले, ना साजन बोले, मनाची नीरव गाणीं
वीणे व्याकुल आपुली राणी
ओसरला ग प्रीतीचा पूर
आसवांत या विरले सूर
लयींत सारखा उडतो ऊर, घायाळ पाखरावाणी
वीणे ! व्याकुल आपुली राणी
जिवाजिवांची सरेल साथ
चंद्राविण भासे काजळी रात
एकली अनाथा असोनी नाथ
होतांच प्रभात, विझेल दीपिका, हासत उदासवाणी
भाळीचें लिखित कसें ग पुसेल,
आणिता डोलिया पाणी ?
वीणे,! व्याकुल आपुली राणी.

: गायिका :
सरस्वती माने

REFBK-0007267
REFBK-0007267

२८७

सरिता प्रकाशन

# नवीन नवीन प्रकाशनें

## रा ज नं दि नी

कवि : राजा बढे

★

## जयकृष्णांचें कुंजवन

कवि : कै. ज. के. उपाध्ये

★

## कुणि कांहीं म्हणा

[ वीणागीतें : भाग २ रा ]

कवि : राजा बढे

★

## टा हो

[ चार विनोदी विलापिका ]

कवि : राजा बढे

★

## रं ज नि का

[ सिनेमांतील गाणीं ]

कवि : राजा बढे

★

## सरिता प्रकाशन

हिंद प्रिंटिंग वर्क्स : मुंबई ४